

# तिवरांची झाडे आणि चित्ते

**प्रसाद शेट्टी**

अलिकडच्या काही वर्षांत निर्माण झालेल्या नवीन पर्यावरणविषयक जाणीवेचा शोध घेता घेता मुंबई शहरातील तीन उदाहरणांचे वर्णन करायचा या निबंधात विचार आहे. ती उदाहरणे नवीन अर्थव्यवस्थेच्या बदलत्या देखाव्यात कशी बसतात हेही पाहायचे आहे. या जाणीवेचे महत्त्वाचे लक्षण म्हणजेच शहराच्या साधनसामुग्रीचा विनियोग पुढे आणणे हाही या निबंधाचा हेतू आहे

***उदाहरण पहिले :***

**नवीन पर्यावरणविषयक जाणीव**

या वर्षी मुंबईत एक विलक्षण घटना घडली. जूनच्या अखेरीस व जुलैच्या सुरुवातीस जवळजवळ दीड आठवडा मुंबईच्या नॅशनल पार्कमधील डझनभर चित्त्यांनी नागरिकांवर सुनियोजित हल्ला केला. व्यवस्थित टॅक्स देणाऱ्या बिचाऱ्या नागरिकांवर हा हल्ला झाला जेव्हा भल्या पहाटे ते आपल्या कुत्र्यांना घेऊन सकाळचा फेरफकटा मारायला गेले होते. पर्यावरणवादी पण लगेच प्रसिद्धीच्या झोतात आले. त्यांनी राष्ट्रीय वृत्तपत्रांतून पहिल्या पानावर चित्त्याच्या हक्कासंबंधी चर्चा सुरू केली, तसे टेलिव्हिजनच्या टॉक शोमध्ये पण चर्चा सुरू झाली. अलिकडच्या काही वर्षातला हा दुसरा प्रसंग असेल. जेव्हा पर्यावरणाला जलद शहरीकरणामुळे मोठाच धोका समजला जात होता.

मुंबईच्या आदिवासी वस्त्यांमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या मते आदिवासींच्या जीवाला या हिस्त्र प्राण्यापासून अतिशय धोका संभवतो. तथापि आमच्या शहरी संवेदनाशीलतेला आता कुठे अशा घटनांमुळे प्रतिसाद द्यावासा वाटतोय. आणि आता पर्यावरणाच्या जाणीवेने थोडे मोठे स्वरुप धारण केले आहे, इतके की निसर्गाची हिरवाई व करडेपणा यांचे जतन व संरक्षण करण्यासाठी सर्व शहरी विभागाला ती हाक घालत आहे. ही चळवळ उद्योजक, व्यावसायिक व चळवळीतील कार्यकर्ते यांनी एकत्रित येऊन जोरदारपणे चालवली आहे.

ही जी जाणीव एकाएकी पुढे आलेली दिसते त्याचे नीट संशोधन होणे जरुर आहे. कारण शहराच्या इतिहासात निसर्गाची हिरवाई व करडेपण यांत नेहमीच जलद बदल घडून आले आहेत. मग ते एकोणिसाव्या व विसाव्या शतकातील भातशेतीजमीन औद्योगिक वापरासाठी बदललेली असो किंवा

अगदी शतकाअखेर काही राहत्या घरांसाठी व व्यापारी कामासाठी भराव टाकून तयार केलेली जमीन असो. तथापि आत्ताच कोठे या तऱ्हेची पर्यावरणविषयक जाणीव एवढी प्रभावी झाली आहे की आपण फ्लेमिंगो, तिवरांची जंगले वगैरे संबंधीची चर्चा नेहमीच्या बोलण्यात करू लागलो आहोत. अलिकडच्या काही वर्षांतील बदलत्या आर्थिक चित्रात या जाणीवेचे स्थान शोधण्याचा माझा हेतू आहे.

उत्पादनांच्या साधनांच्या मालकीचे विकेंद्रीकरण झाल्यानंतर बहुराष्ट्रीय कंपन्या उत्पादन स्वस्त करण्यासाठी स्पर्धा करत आहेत असे दिसत नाही. स्पर्धा ही आता खालच्या स्तरावर म्हणजे सब कॉंट्रॅक्टर याच्यात उतरली आहे. तथापि बहुराष्ट्रीय कंपन्या मालाच्या विक्रीसाठी स्पर्धा करत आहेत. बाजारपेठेपर्यंत पोचण्यासाठी आक्रमक प्रयत्न होत असल्यामुळे विक्रीच्या क्षेत्रात नवीन नवीन बदल करण्यास त्यांना भाग पडले आहे. गृहिणींना एजंट म्हणून नेमणे हे स्पर्धेमुळे लोकांच्या वस्तूंच्या वापरात बदल घडून आला. मार्केटिंगच्या तीव्र धोरणांमुळे वस्तूच्या दर्जाचे महत्त्व वाढले. इलेक्ट्रॉनिक वस्तूच्या विक्रीसाठी स्थापन झालेली 24 तास चालणारी कॉल सेंटर्स, टूथ ब्रशेससाठीच्या लवचिक दांड्या, मोबाईल फोनमधील कॅमेरा या सर्व गोष्टी दर्जा वाढवण्याचेच प्रातिनिधीक रूप म्हणावे लागेल. या बदलाचे वारे ऊर्जा बचतीपासून ते खूप ऊर्जा खाणाऱ्या ग्राहकोपयोगी वस्तूंपर्यंत वाहू लागले. या दर्जाच्या पाठपुराव्यामुळे एका विशिष्ट प्रकारच्या ग्राहकांचे हित रक्षणासाठी विशेष प्रकारच्या सेवांची मागणी निर्माण झाली. घर व्यवस्था पाहणारे सल्लागार, कॉम्प्युटरची देखभाल करणारे एजंट, अंतर्गत सजावट करणारे सल्लागार, शहरात आज सहज मिळू शकतात. शिवाय या मागणीमुळे वस्तूंना एक नवीन मूल्य प्राप्त झाले. त्यातून एक शहरी जाणीव निर्माण झाली. ही जाणीव पर्यावरणासाठी टिकून राहण्याची क्षमता (सस्टेनॅबिलिटी) योग्य सौंदर्यदृष्टी व तणाव शून्य आरामदायी जीवन यांचा शोध घेते. सेंद्रिय शेतीमधील उत्पादने विकणारी दुकाने, निसर्गस्नेही उत्पादने, आरोग्यदायी आहार सल्लागार, सौंदर्यसंवर्धन करणारी केंद्रे, अनेक उपकरणे असलेल्या व्यायामशाळा, शारीरिक आरोग्य राखण्यासाठीच्या उत्पादनांच्या जाहिराती, फर्निचर व फॅशनची छोटी दुकाने या गोष्टी आता समकालीन काळाबरोबर विचारात घेतल्या जाऊ लागल्या आहेत.

या निबंधाचा पहिला मुद्दा असा आहे की पर्यावरणीय जाणीव ही या नवीन अर्थव्यवस्थेत जन्मली व वाढली आहे. या निबंधात असे म्हणायचे आहे की ही नवीन पर्यावरण जाणीव ही फारच थोड्या घटकांचा विचार करण्यावर मर्यादित आहे. हे घटक म्हणजे चित्त्यांच्या हक्कासाठी लढा देणे किंवा शहरातल्या तिवरींच्या जंगलांचे संरक्षण करणे तसेच हे आता अधिकाधिक स्पष्ट होऊ लागले आहे की अशा तऱ्हेची हिरव्या पर्यावरणीय जीवनाची जाणीव (इकोलिव्हिंग) ही स्वच्छता, चांगली राहणी, गुन्ह्यांपासून मुक्त परिसर, आरोग्यदायी खाणे वगैरे संबंधीच्या कल्पनांवर आधारलेली आहे. या गोष्टी जागतिक अर्थव्यवस्थेच्या प्राथमिक मार्केटिंगची तंत्रे आहेत.

या नवीन पर्यावरणीय जाणीवेबद्दल सिद्धान्त मांडताना अमित भावसार या त्याला मध्यमवर्गीय पर्यावरणवाद असे म्हणतात. त्यांचेच शब्दांत म्हणायचे तर सुयोग्य पर्यावरण जे सुरक्षित,आरोग्यदायी, प्रदूषित नसलेले, हिरवे, गर्दीपासून दूर असे आहे. व त्यासंबंधीची काळजी म्हणजेच एका दृष्टीनी पाहिल्यास शारीरिक स्वास्थ्याच्या काळजीचा विस्तारिंत भाग आहे. व्यक्तिगत शारीरिक व मानसिक आरोग्य हे जीवनाच्या दर्जाशी निगडित आहे. समृद्ध सुखवस्तु लोकांना गुन्हेगारी, रोगराई व शहरी जीवनातील इतर तणाव निर्माण करणाऱ्या गोष्टींच्या चिंतांचे निराकरण करणे अधिक सोपे असते. सकाळच्या फेरफटक्यासाठी बगीचे, आध्यात्मिक मदत मिळण्यास मंदिरे किंवा आश्रम, 'अधिक झाडे लावा'सारखी हिरवी जादूची गोळी हे घटक शहर कसे असावे यासंबंधीच्या कल्पनांचे आहेत. यात कष्टकरी लोकांच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या विषयांचा उदा. निवारा, आरोग्य, पाणी, वाहतूक आदींच्या चिंतांचा समावेश नसतो.

मध्यमवर्गीय पर्यावरणवादींसाठी शहरातील उत्पादनांबरोबर येणारी अस्वच्छता दूर केली पाहिजे. धूर ओकणारे कारखाने, प्रदूषित पाणी बाहेर सोडणारे कारखाने व इतर सौंदर्यशास्त्रदृष्ट्या डोळ्यांना खुपणाऱ्या गोष्टी कर्मभूमी झाल्या आहेत. त्याचप्रमाणे जे मजूर या कारखान्यांमध्ये काम करतात, तेही शहरात दिसता कामा नये. सुखवस्तू लोकांना त्यांचे जीवन आरामशीरपणे जगता येण्यासाठी ज्या लोकांच्या सेवा अत्यावश्यक आहेत. उदा. घराकाम करणारे गडी व स्त्रिया, फेरीवाले, किरकोळ सेवा पुरवठादार, यांनी अशा ठिकाणी रहावे जिथे त्यांची घरे (झोपड्या) सुखवस्तूंच्या डोळ्यात खुपणार नाहीत. मध्यमवर्गीय पर्यावरणवाद्यांच्या मते शहरीजागा या फक्त पांढरपेशांसाठी लागणारी उत्पादने, व्यापार व त्याला लागणाऱ्या वापराच्या वस्तू यासाठी राखून ठेवल्या जायला हव्यात. नवीन शॉपिंग मॉल्समध्ये व्यापार फुरसतीचा वेळ यांचे एकमेकांत उत्तम मिश्रण तयार करण्यात आले आहे. कारण त्यामध्ये करमणुकीची साधने, सिनेमागृहे (मल्टीप्लेक्स) व शहरात उगम पावणाऱ्या अन्य गोष्टी दिसून येतात. हे मॉल्स बहुधा झोपडपट्टी नष्ट करून मोकळ्या झालेल्या जागांवर बांधलेले असतात. या सुनियोजित परिसराचा भूदृश्यांच्या बांधण्याची जबाबदारी राजकारणी लोकांशी व महापालिका आधिकाऱ्यांशी लागेबांधे असलेल्या बांधकाम दृष्ट व्यवसायातील गुन्हेगारांनी घेतलेली असते हे आणखी एक गैरसोयींचे सत्य सोयिस्करपणे विसरले जाते.

'भारताचे बाबतीत' मध्यमवर्गीय पर्यावरणवाद पर्यावरण शास्त्र व न्याय हे नेहमी एकमेकांत गुंतलेले असतात' या आपल्या गृहीतकृत्याचा पुनर्विचार करण्यास भाग पडतो. अनेक सामाजिक चळवळींची तत्वज्ञान वर्णन करते म्हणून गरीबांच्या पर्यावरणवादाची कल्पना ही प्रभावी ठरली आहे. पण आपण हे लक्षात ठेवणे जरूर आहे की सर्व पर्यावरणाविषयक चळवळींमुळे सामाजिक न्याय साधतोच असे नाही. खरं तर मध्यमवर्गीयांना पर्यावरणवाद हा शहरी कामगार वर्गाच्या टिकून राहण्याच्या किंवा त्यांच्या इतर हितांच्या सरळसरळ विरोधातच असतो.

भावसार यांच्या आरोपामुळे एक महत्त्वाचा मुद्दा पुढे येतो. शहरी अन्याय व साधनसामुग्रीचा विनियोग यांची प्रक्रिया सुरू होण्यासाठी प्रभावी साधन म्हणून ही जाणीव कशी कारणीभूत होते. मोकळ्या जागांचे लोकहितासाठी अतिक्रमणापासून रक्षण करणे. यासाठीचीच चळवळ या आरोपाखाली उत्तम उदाहरण झाले. भावसार यांच्या या आरोपासह मी दुसरे उदाहरण पुढे देत आहे.

***उदाहरण दुसरे :***

### साधनसामुग्रीची अफरातफर

हे दुसरे उदाहरण तीन खेड्यांचे-अकलोली, वज्रेश्वरी व गणेशपुरी ही गावे मुंबईच्या म्युनिसिपल हद्दीपासून सुमारे 50 किमी. अंतरावर आहेत. परंतु त्यांचा समावेश महानगर प्रदेशात होतो. ही गावे रस्त्यांच्या जाळ्याने व्यवस्थित जोडलेली आहेत. सर्वात जवळचा शहरी भाग येथून30 किमी. अंतरावर असून त्याठिकाणी मोठे रुग्णालय, फायर ब्रिगेड आदि सुविधा उपलब्ध आहेत. मोबाईल फोनचे जाळे जरा दुर्बल आहे व फोनची फक्त सरकारी सेवाच उपलब्ध आहे. तथापि ही गावे उष्ण पाण्याच्या झऱ्यांसाठी प्रसिद्ध आहेत, शिवाय स्थानिक देवदेवतांची संतांची मंदिरे बांधली आहेत. वज्रेश्वरी देवीचे मंदिर, स्वामी नित्यानंद व स्थानिक देव भीमेश्वर यांची मंदिरे या परिसरांत आहेत. वेगवेगळ्या दंतकथा व आख्यायिका लोकांनी एकमेकांना सांगून प्रसृत झाल्या तसेच काही प्रकाशनातूनही प्रसिद्ध झाल्या, त्यामुळे जागेला एक प्रभावी पौराणिक केंद्र म्हणून महत्त्व प्राप्त झाले. अत्यंत दुर्धर आजारातून बरे करण्याच्या या केंद्राचा लौकिक आहे. शिवाय ज्वालामुखी डोंगराचे प्रदेश, पाण्याचा साठे, दाट जंगलाचा प्रदेश यातील भूवैज्ञानिक आश्चर्यामुळे या प्रदेशाशी निगडित अशा दंतकथाच्या कल्पनांत भरच पडली आहे. यामुळे ही गावे धार्मिक यात्रास्थळे बनली आहेत. त्याठिकाणी शेजारील आदिवासी लोक व अलिकडे मोठ्या संख्येने शहरी समाजही आकर्षित होत आहे.

हा प्रदेश पर्यावरणदृष्ट्या ही महत्त्वाचा आहे. कारण

येथील उष्ण पाण्याच्या झऱ्यांची भूवैज्ञानिक स्थिती. शिवाय जवळचा वन विभाग व बारमाही वाहणारी तानसा नदी यामुळे पर्यावरणदृष्ट्या हा प्रदेश संवेदनशील बनतो. हा पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील धार्मिक महत्त्वाचा प्रदेश राज्य सरकारने पर्यटनदृष्ट्या महत्त्वाचा म्हणून मान्य केला आहे व मुंबईच्या प्रादेशिक योजनेमध्ये हा प्रदेश करमणूक व पर्यटन विभाग म्हणून दाखवण्यात आला आहे. सध्याची तिन्ही गावांची लोकसंख्या 10,000च्या थोडी वर आहे. त्यातील बरीच लोकसंख्या (50 टक्के अंदाजे) अनुसूचित जाती व जामातींची आहे.

गांवातील 1/3 पेक्षा जास्त जमीन ही देवळांच्या ट्रस्टच्या मालकीची आहे. आश्चर्याची गोष्ट ही की हा घटक जोराने वाढतो आहे. म्हणजेच अलिकडच्या काही वर्षांत मंदिर ट्रस्टच्या मालकीच्या जमिनीत वाढ होत आहे व गावकऱ्यांच्या मालकीच्या जमिनीत घट होत आहे. असेही आढळून येते की नव्याने संपादन केलेल्या जमिनीभोवती कुंपण घातले जात आहे व त्यांना बिगरशेतीचे प्रमामपत्र मिळवले जात आहे. या जमिनीवर अनेक चैनीची पर्यटन केंद्रे बांधली जात आहेत. ही केंद्रे म्हणजे चैन करण्यासाठीची पर्यटन केंद्रे. उदा. नैसर्गिक उद्याने, ध्यान केंद्रे (मेडिटेशन सेंटर्स) उष्ण झऱ्यांची औषधी केंद्रे वगैरे वगैरे. येथे येणारे ग्राहक आंतरराष्ट्रीय पर्यटक असल्यामुळे एक प्रकारचे आध्यात्मिक पर्यटन स्थळ म्हणून विकसित करण्याचा ट्रस्टचा विचार आहे. ट्रस्टची अशी महत्वाकांक्षा आहे की या परिसराचा विकास एक आध्यात्मिक केंद्र म्हणून करावा व तसे करण्यासाठी लागणारी इच्छाशक्ती, कुवत व साधनसामुग्री ट्रस्टकडे आहे.

म्हणून सरकारने जेव्हा या क्षेत्राच्या विकासास ही काही पैसे खर्च करण्याचे ठरवले तेव्हा एक मोठा प्रश्न पुढे आला व तो म्हणजे आध्यात्मिक वातावरण व या स्थळाचे पावित्र्य हे गांवच्या लोकांनी केलेल्या अर्धवट बांधकामामुळे धोक्यात येत आहे, हा होय. यासाठी एक मुख्य प्रस्ताव गावातून जाणारा रस्ता, हा गावाबाहेरून काढावा, जेणेकरून रस्त्यावरील वाहनांचा वगैरे यात्रेकरूंना त्रास होणार नाही. तथापि गावकऱ्यांनी सरकारच्या या प्रस्तावास कसून विरोध केला. त्याचे म्हणणे असे या नियोजन प्रक्रियेमध्ये गावकऱ्यांच्या हिताकडे लक्ष दिले गेलेले नाही. हा रस्ता गावाबाहेरून नेणे म्हणजे या वस्त्यांना सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेपासून तोडून टाकणे, असे होईल. शिवाय क्रिट (कलेक्टिव्ह रीसर्च इनिशिएटिव्ह ट्रस्ट) ने केलेल्या एका सर्वेक्षणावरून असे दिसत होते की या रस्त्यांच्या दोन्ही बाजूंच्या जमिनी यापैकी एका ट्रस्टने विकत घेतल्या होत्या व स्थानिक अफवांप्रमाणे ट्रस्टला हा रस्ता अंतर्गत (इंटरनल) रस्ता म्हणून वापरायचा होता. ट्रस्टच्या अध्यात्मिक पर्यटकांच्या प्रदूषण न करणाऱ्या विजेवर चालणाऱ्या वाहनांसाठी हा रस्ता त्यांना वापरायचा होता.

स्थानिक कार्यकर्ते व गांवकरी यांच्या दडपणामुळे सरकारला एका तटस्थ एजन्सीची नेमणूक करणे भाग पडले. या एजन्सीला विकासाची प्राथमिकता ठरवावयाची होती. क्रिटलाच हे काम देण्यात आले. क्रिटने शतकांचा इतिहास तपासला. या ठिकाणी स्थानिकांनी वस्ती केली व त्यांचेसाठी उष्ण पाण्याचे झरे व ज्वालामुखी डोंगर ही नित्याची गोष्ट होती. नंतर हे धार्मिक ठिकाण म्हणून विकसित झाले. गजबजलेले रस्ते व घाणेरड्या गर्दीच्या मोकळ्या जागा तयार झाल्या, अशाच तऱ्हेने विकसित झालेल्या जागांचे हे वैशिष्ट्य असते. अलिकडच्या सनातन हिंदू धर्माच्या उसळलेल्या लाटेमुळे शहरी भागातून नवीन प्रकारचे यात्रेकरू इथे येत आहेत व ते पैसा ओतत आहेत.

क्रिटचे सर्वेक्षण आणि हितसंबंध यांची मते यावरून या परिसरातील आर्थिक पाया हा शेतीप्रधान व्यवस्थेकडून पर्यटनाच्या सेवा प्रधानक्षेत्राकडे निश्चितपणे झुकला आहे यात शंका नाही. वज्रेश्वरीच्या स्थानिक बातमीदाराचा असा दावा गावातील 70 टक्के लोक आता पर्यटनासंबंधीत सेवाक्षेत्रांत गुंतले आहेत. शिवाय गावकऱ्यांशी भेटल्यावर त्यांनासुद्धा या प्रदेशात येणाऱ्या प्रयटकांना सेवा देण्याचा उत्साह आहे. अलिकडेच या पर्यटकांसाठीच्या गावकऱ्यांनी देऊ केलेल्या

अनौपचारिक सोयीमध्ये झालेली वाढ ही वरील विधानास पुष्टी देते. त्याचप्रमाणे असेही दिसते की हा उद्योग अजूनही विकसित होण्यास वाव आहे. शेतजमीन बिगरशेतीमध्ये करून घेण्याकडेही लोकांचा कल दिसून येत होता. (ट्रस्टच्या मालकीच्या जमिनी) शेतजमिनीना अपुरा पाणीपुरवठा होत होता. त्यामुळे काहींनी शेतीच्या पद्धतीत बदल करून भाताऐवजी फुलांची शेती केली.

क्रिटच्या ट्रस्टच्या हालचाली संबंधातील संशोधनातून एका ट्रस्टने विकसित केलेल्या सर्व प्रदेशाचा मास्टर प्लॅनचा शोध लागला. ट्रस्टने एका सॅटेलाईट फोटोग्राफ मिळवला. (एरवी अशी उपलब्धी भारतीय परिस्थितीत मिळवणे अवघड आहे) व तो ऑरुव्हिले येथील काही सल्लागारांच्या मदतीने पुढे विकसित केला. (ऑरुव्हिले आग्नेय भारतातील ठिकाण आहे) सर्व प्रदेशाची भौगोलिक स्थिती त्या नकाशात दाखवली होती. प्रत्येक प्लॉट, त्याची मालकी, झाडांची संख्या आदि तपशील त्या नकाशात दाखवला होता. यानंतरचा तपशील ट्रस्टने आधीच संपादित केलेल्या जमिनी व आणखी सहज सपांदन करण्याजोग्या जमिनी वगैरेंची माहितीपण नकाशावर दाखवली होती. मास्टर प्लॅनमध्ये सध्याची गावे, रस्ते यांची नव्या जागी स्थापनापण सूचवली होती. याशिवाय सर्व जागाच नव्हे तर त्याच्या बाहेरीलही बरीच जागा आध्यात्मिक विकासासाठी मोकळ्या करून अनेक स्पाज (नैसर्गिक आरोग्यदायी झरे) करमणुकीची केंद्रे, ध्यानधारणा केंद्रे, स्थानिक वाहतुकीची व्यवस्था, पोहण्याचे तलाव, सौना (उष्ण बाष्प गृह) वगैरे विस्तृत प्रमाणावर दाखवले होते. या मास्टर प्लॅनवरून ट्रस्टच्या कल्पना व हेतू पूर्णपणे स्पष्ट होत होता. क्रिटने जेव्हा गावकऱ्यांशी चर्चा केली तेव्हा गावकऱ्यांना त्यांच्या मालमत्तेतून सक्तीने हुसकून लावण्याचा ट्रस्टचा हेतू उघड झाला. व विशेष म्हणजे ही योजना या प्रदेशातील पर्यावरणीय समतोल टिकवण्यासाठी केली जात आहे असे सांगण्यात आले. अन्यथा गावकऱ्यांच्या उद्योगांमुळे या समतोलास मोठा धोका आहे असे सांगितले गेले.

क्रिटने आपला अहवाल कलेक्टर यांना सर्व सबंधिताच्या हजेरीत सादर केला व साधनसामुग्रीच्या विनिमयाचा मुद्दा पर्यावरण टिकवण्याचे नावाखाली पुढे केला. क्रिटने ज्या प्रश्नावर आपले लक्ष केंद्रीत केले तो म्हणजे गावकऱ्यांना पाणीपुरवठा होत नाही हा सध्या गावकऱ्यांना जेमतेम दरडोई दररोज 10 लिटर पाणी मिळू शकते. व तेही फिल्टर वगैरे नसल्याने वापरण्यास योग्य नाही. त्याचवेळी ट्रस्टच्या स्पा किंवा ध्यानधारणा केंद्रात फ्लॅश व शॉवरसाठी पाणी उपलब्ध होत आहे. क्रिटने ज्या प्रकल्पांना प्राथमिकता दिली होती तो म्हणजे पाणी पुरवठा वाढवणे व त्या योजनेचा पुनर्विकास करणे क्रिटने पुढे अशीही शिफारस केली की या प्रदेशासाठी विकासाचा नकाशा तयार करणे अत्यावश्यक आहे. कारण त्यामुळे सर्व तऱ्हेच्या विकासांवर नियंत्रण ठेवणे शक्य होईल व त्यामुळे हा प्रदेश केवळ पर्यावरण टिकवण्यायोग्यच होणार नाही तर आर्थिक दृष्ट्या पण सक्षम व सर्वांसाठी सारखा फायदेशीर ठरू शकेल.

हा अहवाल सादर झाल्यानंतर निवडणुका झाल्या व त्यानंतर लगेच तातडीने काही सरकारी खर्च करण्याची निकड थंड झाली. दरम्यान क्रिटला असे आढळून आले की ट्रस्टीजनी काही शिक्षक पगारावर घेऊन एका वास्तुशास्त्र विद्यालयावर या प्रदेशाचे पर्यावरणीय अवनती व नियोजन याविषयी संशोधन करण्याचे काम सोपवले. या संशोधनास मुंबई महानगर विकास प्राधिकरणाचे (एमएमआरडीए) अर्थसहाय्य होते. ट्रस्टी व आर्किटेक्चर स्कूलचा स्टाफ यांमधील पत्रव्यवहारातून त्यांनी केलेल्या काही संशोधन प्रस्तावाबद्दल माहिती मिळते.

**ट्रस्टी महोदय,**

आपल्या 12 जून, 2004 च्या मिटिंगनंतर आम्हाला असे वाटले की राजकीयदृष्ट्या संवेदनक्षम प्रदेशात आमच्या इन्स्टिट्यूटच्या डिझाईन सेलतर्फे काम करून मग सरळ एमएमएक्सडीएकडे जाणे हा उत्तम पर्याय असू शकतो. एमएमआरडीएबरोबर शुक्रवारी आमची भेटण्याची वेळ ठरलेली आहे. एनव्हायर्नमेंट इंप्रूव्हमेंट सोसायटीचे सेक्रेटरी/

चेअरमन व सध्याचे एमएमआरडीचे चीफ प्लॅनर यांचेबरोबर मिटिंग ठरली आहे. (ए. इ. सोसायटीनेच आमच्या पवईच्या प्रकल्पास वित्तसहाय्य केले होते.)

मी आमच्या डायरेक्टरांशी बोललो व जो प्रकल्प माझी टीम आपल्या डिझाईन सेलच्या द्वारे हातात घेऊ इच्छिते त्याला एनव्हायर्नमेंट इंप्रूव्हमेंट सोसायटीने पाठिंबा द्यायचे कबूल केले आहे एवढेच सांगितले आत्ता आम्हाला एमएमआरडीएला अधिकृत प्रस्ताव पाठवण्यापूर्वी आमच्या व्यवस्थापनासाठी एक छोटा अहवाल बनवावा लागेल. आमच्याकडे असलेली सर्व माहिती एकत्र करण्याचे काम चालू आहे व एका आठवड्यात आम्ही त्यासंबंधी चर्चा करू शकू असे वाटते. आपल्याला यासाठी कलेक्टर महाशयांचा सुद्धा पाठिंबा काहीतरी करून मिळवावा लागेल, अर्थात एमएमआरडीएच्या सोसायटीची तशी अट नाही. तरीही तुमच्या नोटला त्यांचा सक्रिय पाठिंबा मिळू शकेल अशी आशा आहे. कदाचित जर विकासाचे नियोजन इकॉलॉजीप्रमाणे (प्राणी जीवन व आजूबाजूंची सृष्टी यांचे परस्पर संबंधाबद्दलचे शास्त्र) न केल्यास उष्ण पाण्याचे झरे सुकून जातील हे वास्तव आपल्या मदतीला येऊ शकेल.

सादर

ॲसिस्टंट प्रोफेसर

**संशोधन प्रस्ताव**

तानसा नदीच्या खोऱ्यातील भूऔष्णिक प्रदेशाची पर्यावरण संदर्भातील शाश्वतता. ज्या देशांत तत्त्वज्ञान व अध्यात्म याचा आदर केला जातो तिथे पाण्याच्या रोग बरे करणाऱ्या शक्तीकडे दुर्लक्ष करता येणार नाही. पाण्याचे सर्वसामान्य माणसाच्या जीवनातील स्थान व त्याचे महत्त्व वेगळे सांगण्याची किंवा मुद्दामहून ठसविण्याची गरज नाही. उष्ण पाण्याचे झरे व गीझर्स हे बऱ्याच वेळा मनुष्याचे रोग बरे करण्याच्या शक्तीचे स्रोत आहेत.

या प्रदेशातील उष्ण पाण्याचे झरे हे डोगरांच्या प्रस्तरस्तंभात असतात त्यात अस्तित्त्वात असलेल्या भूऔष्णिक झोनमुळे ते तयार होतात. हे उष्ण पाण्याचे झरे पाण्यात सापडणाऱ्या सूक्ष्म जीवांपासून ते पाणथळीमध्ये वाढणाऱ्या वनस्पती आणि जवळपासच्या प्रदेशांतील जंगलांपर्यंत विविध प्रकारच्या जीवसृष्टीत पोसत असतात. तानसा नदीचे पात्र या जीवसृष्टीच्या दृष्टीतून अद्वितीय असून शहराच्या जवळ असल्यामुळे सतत वाढणाऱ्या मुंबईच्या शहरीकरणाच्या प्रचंड ताणाखाली असून आता तो ताण अगदी टोकापर्यंत पोहचला आहे.... परदेशात बहुतेक देशांत उष्ण पाण्याच्या झऱ्यांचे साठे हे करमणुकीची ठिकाणे मानली जातात व त्यांना शास्त्रीय, शैक्षणिक व संशोधनात्मक महत्व प्राप्त होते. सर्वसाधारणपणे अशा प्रदेशात समान कायदे असतात. प्राणीजीवन व भोवतालचे पर्यावरण यांच्या संरक्षणावर या कायद्याद्वारे भर दिला जातो व या झऱ्याशी लोकांचा प्रत्यक्ष संबंध येऊ नये असे पाहिले जाते. त्याऐवजी स्पाज, रिझॉर्टस्सारख्या स्वतंत्र सोयी तयार केल्या जातात, जेणेकरून या झऱ्यांचे, तलावांचे व नद्यांचे प्रदूषण होऊ नये. या झऱ्यांस भोवतालचा प्रदेश हा नैसर्गिक आरक्षित संदेश म्हणून ठेवलेला असतो व तिथे मार्गदर्शकासह सहली आयोजित केल्या जातात. शहरीकरणांच्या दबावापासून हा प्रदेश अलिप्त ठेवला जातो. पण तरीही तो कुंपण घालून वेगळा केला जात नाही. त्यामुळे स्थानिक लोक हे या प्रदेशाचा भाग म्हणूनच राहतात. अशा तऱ्हेने उष्ण पाण्याचे झरे एवढ्याच क्षेत्राची सीमा न आखता तानसा खोऱ्यातील सर्व उष्ण झऱ्यांच्या प्रभावाखालील प्रदेशाच्या सीमा आखणे जरुरीचे आहे. या प्रभावक्षेत्राच्या अनुषंगाने इथल्या एकंदर उद्योगाची तीव्रता, बांधकाम क्षेत्राची घनता, आतल्या रस्ते पाणी, ड्रेनेज आदि सुविधा, अशा तऱ्हेने ठरवणे आवश्यक आहे की त्यामुळे येथील प्राणीजीवन व पर्यावरण यांचे संरक्षण होईल.

हा संशोधन प्रस्ताव पर्यावरणीय जाणीवेचा सूर आळवतो आहे. पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील प्रदेशांत कशा तऱ्हेचा विकास होऊ द्यावा हे स्पष्टपणे सांगत आहे. त्यांनी हे नि:संदिग्धपणे प्रस्थापित केले आहे की ही संस्था पर्यावरणीय जाणीवेचा उपयोग एका गंभीर विनियोगाच्या प्रकल्पासाठी कशा तऱ्हेने करून घेऊ इच्छिते. मी या उदाहरणाचा शेवट माझ्या दुसऱ्या विधानाने करतो. ते विधान असे पर्यावरणीय जाणीव हे साधनसामग्रीच्या

गैर विनियोगासाठी परिणामकारक शस्त्र आहे. या ठिकाणी हे पूर्णपणे लोकांच्या विरोधी आहे.

*उदाहरण तिसरे :*

**मालमत्ता रक्षणाचे डावपेच**

तिसरे उदाहरण हे वसई विरार या उपप्रदेशाचे आहे. हा प्रदेश मुंबईच्या उत्तरेस लागून आहे व त्याचे क्षेत्रफळ अंदाजे 370 चौ.कि.मी. आहे. हा प्रदेश मुंबईशी द्रुतगती वाहतूक पद्धतीने (रेल्वे लोकल्सनी) आधीच जोडला गेला आहे. त्यामुळे त्याचे मुंबईशी कायमचे संबंध जुळले आहेत. अलिकडच्या काही वर्षांत या प्रदेशात घरबांधणी संकुलाची, छोट्या वस्त्या असलेल्या गावांची भरपूर वाढ झाली असल्याचे दिसते. ही घरे व वस्त्या या शहरात नवीन उदयाला येणाऱ्या मध्यमवर्गाला परवडण्याजोगी होती. या प्रदेशात अनेक ठिकाणी या वरच्या व संकुले उभी राहिली आहेत. विशेष करून रेल्वेमार्गाच्या जवळ, तथापि आतल्या भागातही दलदलीच्या ठिकाणी व शेतजमिनीवरही घरे बांधली गेली आहेत. बिल्डर्संना जशी जमीन मिळेल व त्या जमिनीला प्रवेशासाठी रस्ता मिळेल अशा ठिकाणी ही घरबांधणी झाली.

नव्याने स्थलांतरित झालेले लोकच या भागात रहात आहे असे नव्हे. त्यावेळी इथे येऊन स्थायिक झालेला व्यापारी समाज आजही तिथे राहत आहे. याशिवाय या प्रदेशात वेगवेगळ्या ठिकाणी विशिष्ठ काम करणारे लोक एकत्र वस्ती करून राहतात उदा. शेतकरी वस्ती, मच्छीमार वस्ती, ताडी काढणारी मंडळी, मोठ्या गुरांमध्ये काम करणाऱ्या लोकांची वस्ती वगैरे. या प्रदेशात मोठ्या प्रमाणावर वनविभाग असून त्यावर अनेक आदिवासी पाडे आहेत ते अद्यापही शिकार व उत्पादने गोळा करण्याचे कामात स्वत:ला गुंतवतात.

मुंबई शहराचा असलेला शेजार (नजीकता) व दळणवळणाची असलेली सोय यामुळे या प्रदेशावर निश्चितपणे ताण येतो. त्यामुळे या वस्त्यांचे शहरीकरण होऊ पाहात आहे व ते पूर्णपणे मुख्य शहरावर (मुंबईवर) अवलंबून आहे. हा प्रदेश म्हणजे मुख्य शहराची झोपण्याची जागा (डॉर्मिटरी) किंवा उपनगर झाले आहे. (इथे राहून मुंबईस नोकरीधंदा करणे) स्थानिक कायदे दुर्ब व जागेची प्रचंड मागणी यामुळे जमीनीच्या व्यवहारातील गुन्हेगार या प्रदेशात विकसित झालेत. (सर्व गोष्टींवर दबाव आणू शकणारी शक्तिशाली मंडली). निर्णय घेण्याच्या प्रक्रिया आपल्याला हव्या तशा वाकविण्यात ही मंडळी अतिशय प्रभावी आहेत.

1988 पासून सरकारी यंत्रणा या प्रदेशासाठी विकास आराखडा बनवण्याच्या प्रयत्नांत आहे. त्यावेळेपासूनच एकत्र आलेल्या स्थानिक समाजाने अशा आराखड्यांवर कठोर टीका केली आहे. या प्रदेशासाठी असा आराखडा बनवण्याची प्रक्रिया ही मुंबई महानगर विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) आणि शहर व औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) या दोघांमध्ये आंदोलत राहिली. आंदोलन जवळ एक दशकभर चालू होते. अलिकडे त्रिसदस्य कमिटीची राज्य सरकारने नियुक्त केली. या कमिटीने विकास आराखडा निश्चित करायचा होता व शेवटी कमिटीने 2001 मध्ये हा आराखडा प्रसिद्ध केला.

या प्लॅनमध्ये सूचवलेले या प्रदेशासाठीचे अनेक प्रस्ताव स्थानिक समाजास अत्यंत हरकत घेण्याजोगे वाटत होते. कारण त्यांना असे वाटत होते की या प्रस्तावामुळे बाहेरच्या लोकांना या प्रदेशाचा हवा तसा अनियंत्रित विकास करण्यास उत्तेजन मिळेल व त्यामुळे या प्रदेशाची स्थानिक अर्थव्यवस्था कोलमडून पडेल. या प्रस्तावात अनेक मोठे जमिनीच्या उपयोगातील बदल सूचित केले गेले आहेत. उदा. ओहोटीचे वेळी रिकाम्या राहणाऱ्या, चिखलानी भरलेल्या जमिनी, शहरीकरणासाठी म्हणून दाखवल्या गेल्या होत्या. तसेच मिठागरांच्या जमिनी, दलदलीच्या जमिनी ज्या एरवी शेतीकामासाठी अनेक तऱ्हेनी महत्त्वाच्या आहेत. आराखड्यात पुढे वनविभागात पर्यटक स्थळांना परवानगी दिली होती व शेतीसाठी असलेल्या जागांवर अधिक प्रमाणावर विकासकामे दाखवली होती. स्थानिक समाजाने असा आरोप केला की या प्रस्तावातून स्पष्टपणे बिल्डर्स व डेव्हलपर्स यांना संधी प्राप्त करून देण्याकडे कमिटीचा कल आहे असे दिसून येते.

उलट आराखड्यामध्ये मूलभूत सोयी सवलतींमध्ये सुधारणा करून खाजगी उद्योजकांनी अशा गोष्टींचा लाभ घ्यावा असे सूचवले होते. शिवाय पाणी पुरवठा व ड्रेनेज यांच्या व्यवस्थेवरील प्रस्ताव फारसे चांगले नव्हते व यासाठी साधनसामुग्री एकत्र करण्याचे निश्चित धोरण नव्हते. आणखी महत्त्वाचे म्हणजे विकास आराखडा हा प्रदेश म्हणजे मुंबई शहराचे पाठीमागचे अंगण म्हणून विकसित करू पाहतो. मुंबईची सर्व झोपडपट्टी हलवून या प्रदेशांत त्यांचे पुनर्वसन करण्याचा त्यांचा प्रस्ताव आहे व कचऱ्याचे ढिगारे टाकण्यासाठी जागा येथे तयार करावयाची. मुंबई शहरातील सर्व गुरेढोरे इथे हलवण्याची योजना आहे. विकास आराखड्यात या प्रदेशाच्या अर्थव्यवस्थेची स्थिती याबद्दल एकही शब्द किंवा सूचना दिसत नाही.

स्थानिक समाजाने सर्वपक्षीय वसई-विकास नागरी कृति समिती स्थापन करून त्याद्वारे ते क्रिटकडे गेले. क्रिटने वसई डेव्हलपमेंट प्लॅनचा अभ्यास करून त्याची टीकात्मक छाननी करावी व त्यांच्या हरकती व सूचना राज्य सरकारपुढे मांडाव्यात असे त्यांना सांगितले. क्रिटने प्रदेशाचा व विकास आराखड्याचा तपशीलवार अभ्यास करून असे मत मांडले की या प्लॅनमुळे बिल्डर्स व विकासक यांचेसाठी भरपूर संधी उपलब्ध झाली आहे व त्याच प्रमाणात स्थानिक लोकांना यापासून वंचित केले गेले आहे. ही केस मांडण्यात आल्यावर राज्य प्लॅनिंग समितीचे प्रतिनिधी श्री. हर्डीकर म्हणाले.

''विकास आराखडा नव्या संधी निर्माण करत आहे. तुम्ही (क्रिट) हे एनजीओ आहात व तुमची ही जबाबदारी आहे की संधीचा फायदा कसा घ्यायचा यासाठी लोकांना प्रशिक्षण द्यायचे. आदिवासी लोकांनी एकत्र येऊन एखादे पर्यटन स्थळ का बांधू नये?

सरकार अत्यंत हुशारीने आपला हेका सोडायला तयार नव्हते व या वर्षाच्या सुरुवातीस जेव्हा सरकारने अखेर हाच विकास आराखडा काहीही महत्त्वाचे बदल न करता संमत केला तेव्हा ते स्पष्ट झाले. संमत आराखड्यात विशेष फेरबदल केले नव्हते. निवडणुकीच्या धामधुमीत वसई विकास आराखडा कृति समिती, जी स्थानिक समाजाचे प्रतिनिधित्व करत होती त्यांच्या हालचाली थंडावल्या. ही चळवळ पुढे आणखी थंड होईल असे वाटते. कारण येथील लोकसभा सदस्य एक चित्रपट नायक आहे व विधानसभा सदस्य हा जमीन माफिया आहे.

क्रिटने या प्रदेशात नवनवीन मुद्यांच्या आधारे आपले म्हणणे पुढे रेटायच ठरवले. हे मुद्दे म्हणजे ऐतिहासिक महत्त्व (हेरिटेज), पर्यावरण वस्त्यांची टिकून रहाण्याची क्षमता वगैरे. त्यांनी आधी केलेल्या पर्यावरणीय चळवळीतून बोध घेऊन क्रिटने त्याच कल्पनांचा वापर करण्याचे ठरवले या चळवळी शहर बिल्डर्स व जमीन माफियांच्या तावडीतून सोडवण्याच्या मुद्द्याभोवती केल्या गेल्या. वास्तविक या कल्पनांना क्रिटने अकलोली, वज्रेश्वरी व गणेशपुरी प्रकल्पांत जोरदार विरोध केला होता. क्रिटने काही जलद सर्वेक्षणे होती घेतली (ऐतिहासिक महत्त्व व पर्यावरण यांच्या संरक्षणासाठी केस तयार करण्याच्या उद्देशाने) आणि त्यासाठी त्यांना मुंबई महानगर विकास प्राधिकरणाचा पाठिंबा पण प्राप्त झाला. ही इतकी ऐतिहासिक महत्त्वाची व पर्यावरणदृष्ट्या संवेदनक्षम जागा आहे हे सिद्ध करून त्यांच्या संरक्षणासाठी मार्गदर्शक सूचना तयार करणे यासाठी एमएमआरडीएकडून त्यांनी (क्रिट) पाठिंबा मिळवला. क्रिटला वाटले या डावपेचांमुळे या प्रदेशाचे काही भाग तरी स्थानिक फायद्यासाठी उपलब्ध होतील.

माझा तिसरा सिद्धान्त असा आहे की पर्यावरणीय जाणीव हे एक हत्यार आहे जे साधनसामुग्रीची अफरातफर होण्यापासून संरक्षण करण्यासाठी वापरले जाऊ शकते. याचे कारण या जाणीवेला सध्या बाजारमूल्य आहे. मुंबईमध्ये आपण हे पाहिले आहे की ऐतिहासिक वास्तूंचे संरक्षण व जतन हे शब्द लोकांना एकत्र आणण्यात कसे सफल झाले आहेत. अनेक ठिकाणी अनियंत्रितपणे होणाऱ्या वापरापासून सुरक्षित ठेवण्यासाठी लोकमत संघटित करण्यास व त्यांना राजकीय आशीर्वाद मिळवण्यासाठी शब्द कसे मदत करतात हेही आपण पाहिले.

त्याचप्रमाणे पर्यावरणीय जाणीव हल्लीच्या काळात काहीतरी विशेष आहे व कदाचित अफरातफरीच्या विरुद्ध त्याचा पुनर्वापर करता येईल अशी आशा आहे.

***नोट्स - टीपा***

1) हा संदर्भ माझी श्री. विवेक पंडित यांच्याशी जी चर्चा झाली त्याचेशी आहे. श्री. पंडित मुंबई महानगर विकास प्राधिकरणातील आदिवासी लोकांत गेली 20 वर्षांहून अधिक काम करत आहेत. शिवाय चित्त्यांनी आदिवासी लोकांवर किंवा झोपडीवासीयांवर हल्ला केल्याचे वृत्त काही दिवसांआड करून वृत्तपत्रातून येत असतेच.

2) मुंबई शहर हे सात बेटांचे शहर आहे. या बेटांवर भातशेती, मच्छीमार करणारी गावे व मोठा वनप्रदेश होता. सतराव्या शतकापासून शहराच्या उंच सखलपणात पद्धतशीर बदल घडून आले. शिवाय ब्रिटिश व स्थानिकांनी भराव टाकून भूसंपादन केले, हे भूसंपादन केवळ जास्त जागा मिळवण्याच्या हेतून केले नव्हते तर दलदलीच्या भागातन डासांचे निर्मूलन करण्यासाठी केले गेले होते.

3) भावसार अमिता (2004) शहराचे राजकारण. वेब बेस्ड लेख 21 ऑक्टोबर, 2004 ला ॲक्सेस केलेला. तो या वेबसाईटवर उपलब्ध आहे. hppt://www.india-seminar.com/2002/516/516 अमिता बाविस्कर htm

4) अकलोली, वज्रेश्वरी व गणेशपुरी ही तीन खेडी मुंबई अहमदाबाद हायवेपासून 16 किलोमीटर्स पूर्वेकडे ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यात बसली आहेत. ती ठिकाणे तीन शहरीवस्त्या वाडा, वसई व भिवंडी येथून सारख्याच अंतरावर (30 किमी) आहेत. या तिन्ही शहरापासून ही गावे रस्त्यांनी तसेच सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेने जोडलेली आहेत. शिरसाड अमांडी रस्ता हा मुख्य जोडणारा रस्ता या तिन्ही गावांतून जातो व दोन टोके जोडतो. शिरसाड फाटा हा पश्चिमेस मुंबई अहमदाबाद हायवेवर असून अंबाडीनाका पूर्वेस भिवंडीवाडा रोडवर आहे. या प्रदेशाचे बाजूस तानसा नदी वाहते (उत्तरेकडे) व दक्षिणेस तुंगारेश्वरचे जंगल आहे.

5) हे पूर्ण क्षेत्र (तिन्ही गावे धरून) 947 हेक्टर्सचे आहे त्यापैकी 416 हेक्टर्सवर वनजमीन आहे. ही जमीन वज्रेश्वरी व गणेशपुरी येथील वेगवेगळ्या ट्रस्टची आहे. सिद्धपीठ ट्रस्टची जमीन कुंपण घातलेली आहे व ती केवळ त्यांच्या कार्यक्रमांसाठी वापरली जाते. इतर दोन ट्रस्टच्या जमिनीत त्यांचे भाडेकरू राहतात.

6) क्रिटने जो अभ्यास हातात घेतला तेव्हाच हे स्पष्ट झाले. ठाण्याच्या कलेक्टरांबरोबरच्या मिटिंग्ज ट्रस्टींच्या सोयीप्रमाणे घेतल्या जात. उच्च सरकारी अधिकाऱ्यांना ट्रस्टच्या आश्रमांत शांतपणे वेळ घालवण्यासाठी निमंत्रित केले जाई.

7) जून 2004 च्या मध्यावर क्रिटची नेमणूक करण्यात आली. सरकारने त्यांना एक प्राथमिक अहवाल द्यायला सांगितले ज्यामुळे त्यांना प्रकल्पांची प्राथमिकता व कार्यक्रम ठरवणे सोपे जाईल. क्रिटला गावकऱ्यांची विकास प्रक्रियेसंबंधी मते व अपेक्षा समजाऊन घेऊन त्या सादर करण्यास सांगितले. पूर्ण अहवाल पीडीएफ फॉरमॅटमध्ये उपलब्ध आहे. स्थळ www.crit.org.in

8) क्रिट अशा तऱ्हेचे अनेक पत्रव्यवहार मिळवू शकला ज्यामुळे केआरव्हीआयए स्टाफ व मंदिराचे ट्रस्टी यामधील सबंध प्रस्थापित झाले.

9) हा उतारा कमला नेहरू विद्यानिधी इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्चरच्या डिझाईन सेलने बनवलेल्या शोध प्रस्तावातून घेतला आहे. हा प्रस्ताव तयार करून जुलै 2004 मध्ये लिहिला गेला. यासाठी मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने हा प्रकल्प प्रायोजित करण्याचे निश्चित केले व ते ऑक्टोबर 2004 मध्ये मिळाले.

**अनुवादक : एस. एन. निबंधे**

■ ■ ■ ■ ■

